# अनुभवा सी विंड्स गुहागरमधील गेट टुगेदर


डॉ. जितेंद्र खेर

आजकालच्या धावपळीत आपल्याला स्वत:साठीच जर वेळ मिळत नाही तर कुटुंबाबरोबर, मित्र परिवारासोबत वेळ घालवणं हे केवळ एक सुंदर स्वप्नच राहून जातं. म्हटलं तर हे स्वप्न आपण खरं करू शकतो, पण एकत्र वेळ घालवायचं ठरलं तर एवढ्या सगळ्यांना आपल्या घरी एकत्र आणायचं तर त्यांचं आदरातिथ्य करण्यातच घरातल्या स्त्रियांचा पूर्ण वेळ जातो. तुम्हाला छान एक-दोन दिवस केवळ मजाच करायची असेल, रिलॅक्स व्हायचं असेल आणि ते सुद्धा कोणतेही कष्ट न करता तर असा 'गेट टुगेदर' काय रंगत आणेल, नाही का? हॉटेल-रिसॉर्टस् तर भरपूर आहेत पण त्याचबरोबर निसर्गाशी ही एकरुप होता येत असेल आणि आकर्षक दर, उत्तम सर्विस आणि सुरेख रुम मिळत असतील तर काय मजा येईल, हो ना?

त्यासाठी फार काही शोधा-शोध करायची गरज नाही. जर तुम्हाला समुद्राच्या सान्निध्यात राहणं आवडत असेल तर पुणे-मुंबई पासून अवघ्या पाच तासांच्या अंतरावर असलेलं कोकणातलं निसर्गरम्य गुहागर हे ठिकाण तुम्ही अनुभवायलाच हवं. निसर्गानं सौंदर्याची भरभरून उधळणं केल्यामुळे आणि इथल्या आकर्षक आणि स्वच्छ समुद्र किनाऱ्यामुळे गुहागर हे एक उत्तम 'टूरीस्ट डेस्टीनेशन' बनलं आहे, इथं माऊंटन रेंजचं हॉटेल सी-विंडस् इथं राहण्याचा एक परफेक्ट पर्याय ठरेल. माऊंटन रेंजचे संचालक आणि अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित डॉ. जितेंद्र खेर यांच्या कल्पना शक्तीतून अगदी वाजवी दर आणि त्याचबरोबर उच्च दर्जाच्या सोयी-सुविधा असा सुंदर मिलाफ साधून हे हॉटेल गेली अनेक वर्ष देशी-विदेशी पर्यटकांना उत्तम सेवा देत आहे.

सी-विंडस् हे थ्री स्टार दर्जाचं हॉटेल असून इथल्या एसी आणि नॉन एसी रुममध्ये उत्तम दर्जाच्या


हॉटेल सी विंड्स

आधुनिक सोयी आहेत. हॉटेलचं हिरवंगार गार्डन अतिशय मनमोहक आहे. शिवाय लहान मुलांसाठी किडस् प्ले एरियाही आहे. सी-विंडस् समुद्र किनाऱ्यापासून अगदी जवळच्या अंतरावर आहे.

गुहागर इथला व्याडेश्वर, दुर्गादेवी, उफराटा ही विविध देवस्थानं सी विंडस् हॉटेलपासून अगदी जवळ आहेत. वेळणेश्वर, हेदवी, अंजनवेलचं लाईट हाऊस, गोपाळगड, बामणघळ ही नयनरम्य पर्यटनस्थळंही इथून जवळच आहेत. या सुंदर गावात तुम्ही तुमच्या कुटुंबासमवेत, मित्र परिवाराबरोबर अविस्मरणीय क्षण घालवू शकता आणि सी विंडस् या क्षणांची रंगत अजून वाढवण्यात नक्कीच मदत करेल. चला तर मग प्लॅन करा तुमचा जिव्हाळ्याचा गेट टुगेदर आणि एन्जॉय करा सी विंडस् सोबत गुहागरच्या सुंदर समुद्रकिनारी.


अधिक माहितीसाठी संपर्क : ०२२-२५४५१२३४, ९९२०९९४२२९, ९२२४५८६०६०
www.seawinds.in